# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ८१ वा ❑ मंगळवार दि.०६ मे २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## अल्पवयीन मुलांच्या बाबतीत संथारा योग्य की अयोग्य ?


– प्रा डॉ सुधीर अग्रवाल


**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

इंदूरमधील तीन वर्षांच्या मुलीला असाध्य आजार जडला, मात्र ती बचावण्याची शक्यता अत्यल्प उरल्याने माता-पित्यानेच तिला संथारा देण्याचा धक्कादायक निर्णय घेतला. डॉक्टरांनी वियाना जैन या तीन वर्षांच्या चिमुरडीला ब्रेन ट्यूमर असल्याचे निदान केले होते. संथारा म्हणजे जैन धर्मानुसार उपवास करुन मृत्यू स्वीकारण्याची प्रथा. वियानाचे वडील पियुष जैन उच्चशिक्षित असून आयटी क्षेत्रात काम करतात. वियानावर मुंबईत उपचार सुरु असताना तिची तब्येत खालावली. यावेळी धार्मिक गुरु राजेश मुनी महाराज यांच्या भेटीत वियानाला संथारा देण्याचा पर्याय सुचवण्यात आला. त्यानंतर कुटुंबाने संथारा देण्याचा पर्याय सुचवण्यात आला. त्यानंतर कुटुंबाने संथारा देण्याचा धार्मिक मार्ग निवडला. परंतु या घटनेमुळे अनेक कायदेशीर आणि नैतिक प्रश्न निर्माण झाले आहे.संथारा, जैन धर्मातील स्वेच्छेने मृत्युसाठी उपवास करण्याची प्रथा, बेकायदेशीर नाही. २०१५ मध्ये, राजस्थान उच्च न्यायालयाने ही प्रथा आत्महत्येचा एक प्रकार मानली आणि ती बेकायदेशीर घोषित केली, परंतु सर्वोच्च न्यायालयाने या आदेशाला स्थगिती दिली, त्यानंतर ही प्रथा सुरूच राहिली. संथारा, ज्याला सल्लेखाना म्हणूनही ओळखले जाते, ही जैन धर्माची एक महत्त्वाची धार्मिक प्रथा आहे, ज्यामध्ये एखादी व्यक्ती स्वेच्छेने उपवास करून आपल्या मृत्यूची तयारी करते. जैन धर्मात हे एक पवित्र आणि सन्माननीय कृत्य मानले जाते. संथारा आणि कायदेशीर पैलूबद्दल काही महत्त्वाचे मुद्दे येथे आहेत:

**कायदेशीर मान्यता:**

सर्वोच्च न्यायालयाने संथाराला वैध ठरवले आहे आणि ते धार्मिक स्वातंत्र्याचे एक रूप मानले आहे. संथारा ही आत्महत्येपेक्षा वेगळी मानली जाते कारण ती एक धार्मिक निर्णय आहे, तर आत्महत्या ही निराशा किंवा तणावातून केलेली कृती आहे. संथारा घेणाऱ्या व्यक्तीला हा निर्णय पूर्णपणे स्वतःच्या इच्छेने घ्यावा लागतो आणि ही एक लांब आणि संथ प्रक्रिया आहे ज्यामध्ये त्या व्यक्तीला मागे हटण्याची संधी असते. सल्लेखाना आणि संथारा ही एकाच प्रथेची वेगवेगळी नावे आहेत.

संथारा ही जैन धर्मातील एक महत्त्वाची धार्मिक प्रथा आहे आणि जैन लोक तिचा खूप आदर करतात. संथारा घेणाऱ्या व्यक्तीला त्याच्या आरोग्याबाबत डॉक्टरांचा सल्ला घेण्याची परवानगी आहे.

मुले आणि किशोरांना परवानगी नाही:

मुलांना आणि तरुणांना संथारा घेण्यास मनाई आहे. मात्र या निर्णयाच्या विरोधात जाऊन इंदोर येथील तीन वर्षीय मुलीला तिच्या पालकांनी एका आध्यात्मिक गुरूच्या सल्ल्यानुसार जैन धर्मात दीक्षा दिली आणि मृत्यू पर्यंत उपवास केला आणि यातच तिचा मृत्यू झाला.

एका अल्पवयीन मुलीच्या संथारावर कायदेतज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. एखाद्या अल्पवयीन मुलाच्या जीवनाचा आणि मृत्यूचा निर्णय घेण्याचा अधिकार पालकांनाही नाही. संथारा अशा अल्पवयीन मुलाला देता येतो का जो कायद्याने किंवा भावनिक दृष्ट्या मृत्यू समजू शकत नाही हा एक गंभीर कायदेशीर आणि घटनात्मक प्रश्न आहे. इकडे कलम २५ धार्मिक स्वातंत्र्य देते पण ते कायद्यापेक्षा मोठे नाही धार्मिक प्रथा देखील अल्पवयीन मुलाच्या जगण्याच्या अधिकारावर उल्लंघन करू शकत नाही याचाच अर्थ धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली कायद्याचे उल्लंघनकरता येत नाही. संथारा योग्य आहे की नाही? अल्पवयीन मुलांसाठी हा निर्णय कोण घेऊ शकतो? कायद्याने याबद्दल काय तरतूद आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

२०१५ मध्ये राजस्थान उच्च न्यायालयाने संथारा बेकायदेशीर ठरवला होता.३०६ अंतर्गत आत्महत्या मानले.मात्र जैन समुदायाच्या लोकांनी या निर्णयाविरुद्ध देशव्यापी आंदोलन केले होते.परिणामतः सर्वोच्य न्यायालयाने राजस्थान उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती दिली.या प्रकरणामध्ये अल्पवयीन मुलानी संथारा घेतल्यास काय कराचे,याबद्दल कोणताही नियम नाही.यावर कायदेशीर दृष्टिकोनातून विचारमंथन होणे आवश्यक आहे.

## स्वा सावरकर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाची उज्वल निकालाची परंपरा कायम

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**




**बीड** – भाशिप्र संस्था संचलित स्वा सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया चा एच एस सी फेबु २०२५ बोर्ड परिक्षाचा निकाल ऑन लाईन जाहीर झाला . विद्यालयतील विविध शाखाचा निकाल कला शाखा १००% विज्ञान शाखा ९८ ८०% एच सी व्होकेशनल ९६.५९ % लागला .कला शाखा विशेष प्राविण्य ०४, प्रथम श्रेणी १९ व्दितीय श्रेणी २२, पास श्रेणी ०१ विज्ञान शाखा विशेष प्राविण्य २५, प्रथम श्रेणी ५७ एच सी होकेशनल विशेष प्राविण्य ०९, प्रथमश्रेणी ५१ व्दितीय श्रेणी १९ पास श्रेणी ०६, महाविद्यालयातील विविध शाखेतील गुणवंत – कला शाखा प्रथम –श्रावणी उल्हास संचेती गुण ५५९, शेकडा गुण ९३ .१७% व्दितीय –अस्मिता अरविंद धर्माधिकारी गुण ५११ शेकडा गुण ८५ . १७ %, तृतीय – ऋचा मकरंद मुळे गुण ४९३ शेकडा ८२.१७ %, चतुर्थ मयुर बळीराम शिंदे गुण ४८२ शेकडा गुण ८० .३३% विज्ञान शाखा प्रथम श्रावणी आशिष मालु गुण ५३२ शेकडा ८८ .६७ % व्दितीय कृष्णा शाम सुंदर झंवर गुण ५०५ शेकडा ८४ .१७ %, तृतीय – आदि त्य अमोल कुलकर्णी गुण ५०४ शेकडा ८४%, चतुर्थ – तन्वी प्रदीप आवारे गुण ४९५ शेकडा गुण ८२ .५० %, पाचवा – सार्थक प्रीप भोसकर गुण ४९२ शेकडा गुण ८२% एच एस सी व्होकेशनल. अकोटिंग अँन्ड ऑफीस मॅनेजमेंट प्रथम – विशाल गणेश कहार गुण ४७५ शेकडा गुण ७९ १७%, व्दितीय – ऋषीकेश रामेश्वर थोरबोले गुण ४६४ शेकडा गुण ७७ ३ ३ %, बँकिंग अँन्ड फायनान्शिएल सर्विस प्रथम पल्लवी सुर्यकांत डहाळे गुण ४८९ शेकडा गुण ८१ .५० %, व्दितीय अविनाश सुधाकर कसबे गुण ४३५ शेकडा गुण ७२.५० %, लॉजिस्टिक अँन्ड सप्लाय चेन मॅनेजमेट प्रथम सायली सिध्देश्वर शेटे गुण ४६६ शेक डा गुण ७७ .६७%, व्दितीय तनश्री राजेद्र गुरखुदे गुण ४५० शेक डा गुण ७५%, मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी

प्रथम – गायत्री उमाजी चांदणे ४७६ गुण शेकडा गुण ७९ .३३ %, व्दितीय – वैष्णवी सदानंद दोडके गुण ४५४ शेकडा गुण ७५ .६७%, सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थाचे अभिनंदन . भाशिप्र संस्था अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर , डॉ हेमंत वैद्य कार्यवाह, प्रा चंद्रकांत मुळे प्रशासकीय अधिकारी, विधासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, स्थानिक व्यवस्था मंडळ अध्यक्ष डॉ पी के कुलकर्णी, डॉ अविनाश देशपांडे कार्य वाह, प्रमोद कुलकर्णी शालेय समिती अध्यक्ष, प्राचार्य विठ्ठल काळे, माधव जोशी उप मुख्याध्यापक, विभाग प्रमुख प्रा बाळासाहेब साळवे, डॉ दीपक देशमुख सर्व संस्था पदाधिकारी, सभासद प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी केले आहे.

## बालव्याख्याता साई मोहन जनकल्याण फाउंडेशनतर्फे सन्मानित

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**श्रीरामपूर** – जनकल्याण फाउंडेशन गोंडेगाव तालुका नेवासा जिल्हा अहिल्यानगर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.या निमित्ताने पुरस्कार वितरण आणि कवीसंमेलन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळेवाडी येथील बालव्याख्याता साई उत्तम मोहन याने आपल्या आठ मिनिटांच्या भाषणात रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, ग्रामगीताकार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, आणि भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी समर्पक मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला उपस्थित उपप्रादेशिक अधिकारी राणी सोनवणे मॅडम तसेच पीएसआय राणी जाधव मॅडम, माजी पोलीस अधिकारी क्राइम ब्रांच अहिल्यानगर सुभाष सोनवणे, जनकल्याण फाउंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे, ज्येष्ठ साहित्यिक सुभाष दादा कर्डक सुमनताई तिजोरे ग्रामीण कवी आनंदा साळवे, गझलकार रज्जाक शेख यांच्या शुभहस्ते साईला सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, ग्रामगीता आणि गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.या सन्मानाबद्दल सरपंच, उपसरपंच माळेवाडी, विविध कार्यकारी सोसायटी माळेवाडी, शाळा व्यवस्थापन समिती माळेवाडी, मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांच्याकडून त्याचे कौतुक होत आहे.



## नारंगी अर्थव्यवस्थेचे सुवर्णयुग : वेव्ह शिखर परिषदेचे प्रमेय




पहिल्या वेव्ह शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांनी आर्थिक विकासाचा नवा सिद्धांत मांडला आहे. वैश्विक पातळीवरील प्रतिभाशक्ती आणि सर्जनशीलतेला सामावून घेणार्या जागतिक परिसंस्थेचा पाया वेव्ह या व्यासपीठामुळे रचला जात आहे. भारत जगामध्ये कल्पक आशय निर्मितीची राजधानी म्हणून उदयास येत आहे. भारतात श्रेष्ठ कलाकृतींची निर्मिती आणि जगासाठी भव्योदात्त रंजन गुणवत्ता निर्माण करण्याची वेळ आली आहे. या प्रक्रियेत यही समय है, सही समय है, असे ठोस प्रतिपादन करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेव्ह परिषदेच्या माध्यमातून प्रखर आत्मविश्वास प्रकट केला आहे.

प्रस्तावना:

'आनो भद्रः क्रतवो यंतु विश्वतः' ऋग्वेद संहिता १.८९.१ याचा अर्थ असा की, सर्व दिशांनी येणारे चांगले विचार आपल्या कानावर पडू देत. भारताच्या आशय निर्मितीचा हाच श्रेष्ठ गाभा आहे. मार्शल मॅक्लुहान या माध्यम तज्ञाने संज्ञापन क्रांतीमुळे सारे जग एक सुंदर खेडे होईल असे वर्णन केले होते. त्याच्या सिद्धांताचा प्रत्यय २१ व्या शतकात झपाट्याने येत आहे. विशेषतः नवी माध्यमे ही मानवाच्या ज्ञानेंद्रियाचा विस्तार करीत आहेत. नभोवाणी हा कानाचा विस्तार, चित्रवाणी हा डोळ्याचा विस्तार, संगणक हा मानवी मज्जासंस्थेचा विस्तार करीत आहे. विशेषतः माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र मिळून सबंध जगामध्ये भारताचे जे प्रभुत्व निर्माण झाले आहे ते अनन्य साधारण श्रेष्ठ उंचीचे आहे. भारताच्या राष्ट्रीय विकास वेगाच्या तिप्पट माहिती व मनोरंजन उद्योगाचा वेग आहे. त्यामुळे भारत माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राची राजधानी म्हणून उदयास येत आहे. शिवाय या क्षेत्रातील सॉफ्ट सुपर पॉवर म्हणून भारताचे स्थान जगात पहिल्या क्रमांकाचे आहे. जगामध्ये सर्वाधिक चित्रपट निर्माण करणारा देश कोण असेल तर तो भारत आहे आणि या क्षेत्रात अमेरिकेलाही भारताने मागे टाकले आहे. भारतातील ३५ पेक्षा जास्त प्रादेशिक भाषांमध्ये कंटेन्ट किंवा आशय चित्रपटाच्या माध्यमातून निर्माण केला जात आहे. स्टोरी टेलींग किंवा कथाकथनाच्या बाबतीत जगामध्ये भारताचा क्रमांक पहिला आहे. १०,००० वर्षांपासून भारतीय आपल्या कथा आणि व्यथा माध्यमांच्याद्वारे सार्या जगाला सांगत आहेत. त्यातच भारताच्या मनोरंजन उद्योगाचे मर्म दडलेले आहे.

वेव्ह शिखर परिषदेचे खरे उद्दिष्ट मनोरंजन क्षेत्रातील नवनव्या रोजगार क्षमतांचा शोध घेऊन तरुणांना त्यासाठी सज्ज करणे हा आहे. या परिषदेचे घोषवाक्य ''कनेक्टिंग क्रिएटर्स, कनेक्टिंग कंट्रीज'' असे आहे. माहिती व मनोरंजन उद्योगाच्या दृष्टीने ही परिषद म्हणजे एक जागतिक कुंभमेळाच ठरली आहे. शिवाय माहिती व मनोरंजन उद्योगापुढील समस्यांचा, संधींचा आणि आव्हानांचा सुद्धा




प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
मोबाईल नं. 9225313592
ई-1108, कल्पतरू,
ग्लोरिया ग्रेस,
बावधन, पुणे


त्यामध्ये विचार होत आहे. या परिषदेचे मंथनतत्त्व आणि त्यातील दृढतर सिद्धांतांची मांडणी करण्यासाठी प्रस्तुत लेखाची योजना केली आहे. त्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचारमंथनाचा विशेष परामर्श घेतला आहे.

मुंबई हे केंद्रस्थान:

१९१३ साली मूळ नाशिकचे असलेले आणि अस्सल मराठी बाणा लाभलेले दादासाहेब फाळके यांनी पहिला चित्रपट निर्माण केला. तेव्हापासून भारतीय सृजनशील निर्मात्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. आज भारताचा चित्रपट उद्योगातील झपाटा एवढा मोठा आहे की, भले भले देश मागे पडले आहेत आणि मनोरंजन उद्योगातील कलात्मकता, सृजनशीलता, उद्यमशीलता आणि नव्या क्षितिजांचा शोध घेण्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा यामुळे माहिती व मनोरंजन क्षेत्रात भारत अग्रभागी आहे. ही परिषद देशाच्या अन्य महानगरांपेक्षा मुंबईत का होत आहे? त्याची तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे येथील बॉलीवूड चित्रपट उद्योगातील कल्पक आणि कलात्मक क्षमतांची गरुडझेप. दुसरे म्हणजे भारताची आर्थिक राजधानी या नात्याने या उद्योगाला गगनात भरारी घेण्यासाठी पंख देण्याचे सामर्थ्य आणि तिसरे म्हणजे नव्या जगात चित्रपट आणि पूरक उद्योगांना नव्या संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता केवळ या माध्यमात आहे. हे लक्षात घेऊन मुंबईची निवड करण्यात आली आहे. त्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दूरदृष्टी आहे. दावोस येथे व्यापार परिषद दरवर्षी होते. कान्स येथे चित्रपट महोत्सव होतो. त्याच पद्धतीने मुंबईमध्ये आता ही वेव्ह परिषदेची जी मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे ती भविष्यकाळामध्ये वैश्विक कुंभमेळ्याची एक सक्षम बैठक म्हणून उदयास आली आहे.

भारतीय मनोरंजन उद्योग आज एका नव्या वळणावर उभा आहे. त्याला अनंत आकाशात झेप घेण्यासाठी पंखात बळ हवे आहे. देशातील तरुणांच्या आशा आकांक्षा पल्लवित करण्याचे आणि त्यांना रोजगाराची नवी क्षेत्रे मिळवून देण्याचे सामर्थ्य या उद्योगात असल्यामुळे त्याचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी संरचनात्मक व्यवस्था सुद्धा विकसित करावी लागणार आहे. अशी व्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीने मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी म्हणजे भारतीय कल्पक तंत्रज्ञान संस्था ही आता नव्याने उदयास येत आहे. अशा प्रकारची अभिनव कल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या अपूर्व प्रतिभाशक्तीतून विकसित केली आहे. कारण नव्या जगात कल्पकता ही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिक सक्षम आणि तेवढीच तेजःपुंज बनू शकते. या दृष्टीने कल्पकतेला तंत्रज्ञानाची जोड देण्याची योजना या संस्थेमार्फत करण्यात येईल आणि ही संस्था वैश्विक स्तरावर श्रेष्ठ गुणवत्तेचे शिखर बनेल असा प्रयत्न केला जाणार आहे.

नारंगी अर्थव्यवस्थेचे सुवर्णयुगः

वर्तमान काळ हा भारताच्या नारंगी अर्थव्यवस्थेच्या सूर्योदयाची पहाट आहे. श्रेष्ठ निर्मितीचे समाधान, कल्पकता आणि सर्जनशीलता तसेच सांस्कृतिक अभिव्यक्ती हे या नारंगी अर्थव्यवस्थेचे तीन प्रमुख आधार आहेत असे सुवर्णतत्त्व सांगून पंतप्रधानांनी नव्या अभ्युदयाची नांदी प्रकट केली आहे. दादासाहेब फाळके यांच्या जयंतीच्या दुसर्या दिवशी आणि त्यांच्या 'राजा हरिश्चंद्र' ला १०० वर्षे पूर्ण होत असताना हा सुवर्णयोग जुळवून आला आहे. त्यामुळे दुधात साखर पडली आहे. संगीत, चित्रपट, गेमिंग, फॅशन या नव्या मनोरंजन उद्योगाचे भारत हा एक तेजस्वी वलयस्थान हब म्हणून उदयास येत आहे. नव्या नारंगी अर्थव्यवस्थेच्या भरभराटीमुळे भारताच्या ग्राफिक आणि ॲनिमेशन उद्योगातही गतिमान तेजी येणार आहे. नवी गरुडझेप घेणार्या अर्थव्यवस्थेच्या पंखात त्यामुळे अधिकचे बळ लाभेल. जगातील तिसर्या काय पण आता पहिल्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेचे स्थान घेण्यासाठी भारत पुढे सरसावत आहे. नव्या जगात तंत्रज्ञान लोकांच्या जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणीत आहे. या काळात मानवी संवेदनशीलता जपण्यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. सर्जनशील जबाबदारी पाळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. माणसांना रोबो बनवू नये. आपणास त्यांना अधिक संवेदनशील बनविण्याची गरज आहे. हे सुवर्णतत्त्व मोदी सिद्धांताचा गाभा आहे. **(क्रमशः)**



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



## आनंदी पहाट...

## निरंतर आनंद पैशाने विकत घेता येत नाही


ज्योतिर्मय साहित्य

कालचा दिवस संपला, तरच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपले नवे आयुष्यच जणू काही सुरु होत असते. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच पण शिवाय मन:शांती अधिक प्राप्त होत राहते. हल्ली जगात पैशाने काहीही विकत घेता येते आणि विकताही येते. असे जरी असले तरीही मन:शांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वत: आनंदाची निर्मिती करायची असते. त्याची अनेकदा आपण अपेक्षा इतरांकडून करतो, पर्यायाने निराश होतो.

''आजचा दिवस माझा'' हेच सत्य आहे आणि म्हणूनच ते सिद्धही केले पाहिजे. आपल्याला आपण स्वत: प्रसिद्ध होण्याची इर्षा असते आणि ती असलीच पाहिजे पण प्रसिद्ध होण्यासाठी अगोदर स्वत:ला सिद्ध करण्याची जरुरी असते हे मात्र आपण विसरतो. केवळ विचारांत, स्वप्नांत, भ्रमांत आणि संभ्रमांत न अडकून पडता कार्यकक्षांच्या मर्यादा ओलांडाव्या लागतात, स्वत:ला झोकून देऊन प्रत्यक्ष कार्यकृती करावी लागते, हे मनात आले पाहिजे, आपण ध्यानांत घेतले पाहिजे.

चांगले-वाईट, चूक-बरोबर, खरे-खोटे अशा अनेक समस्या आपल्याला भेडसावत राहतात. अशावेळी, आनंद तर नाहीच पण दु:ख आणि निराशा पदरी येते. मग आपण दोष मात्र आपल्या नशिबाला नाहीतर परमेश्वरालाच देत राहतो. अनेकदा नकारात्मक विचारच आपले नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानाने आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचे अनुभवायला येऊ लागते.

## जंगलाच्या छायेत बारटांग बेट





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

दिनांक २५/२/२०२५. अंदमान मधील ठिकाणे पाहण्याचा आजचा हा शेवटचा टप्पा. या दिवशी आम्हाला सकाळी चार वाजताच उठून तयार राहायला सांगितले होते त्याप्रमाणे आम्ही आवरून तयार झालो. आमचा पुढचा प्रवास आता बसने होणार होता. साधारणपणे दोन तासांचा हा प्रवास होता. आम्ही निघालो तेव्हा अंधार होता परंतु लवकरच उजाडले. अंदमानमध्ये तसा सूर्योदय लवकर होतो. आणि आम्हाला लक्षात आले की आमची गाडी पोर्ट ब्लेअर शहर सोडून जंगलाच्या दिशेने धावत आहे. आजूबाजूला गर्द झाडी होती. रस्ता चांगला परंतु लहान होता आणि एवढ्या जंगलाच्या अंतर्भागातही वाहनांची येजा सुरू होती.






सकाळी लवकर जंगलातील मार्गाने जाण्याचा अनुभव काही वेगळाच. विशेष शासकीय परवानगी, वेळेचं काटेकोर पालन आणि त्या रस्त्यावरची शिस्त हे सर्व पाळत आम्ही हळूहळू आदिवासी भागातून पुढे जात होती. गाडीची आणि गाडीतील प्रवाशांची कागदपत्रे तपासून मगच वाहने पुढे जाऊ दिली जात होती. त्या ठिकाणी वाहनांची प्रचंड रांग होती पण कोणीही गडबड करीत नव्हते. उगीचच गाड्यांचे हॉर्न वाजवीत नव्हते. आम्हाला बराच वेळ थांबून आमचा नंबर येईपर्यंत वाट पाहावी लागली.

आम्हाला आजूबाजूला जे हिरवेगार घनघाट असे जंगल दिसत होते, त्या जंगलाच्या अंतर्भागात जारवा आदिवासींची वस्ती आहे असे सांगितले गेले. हे आदिवासी अजूनही आपल्या पूर्वीच्याच आदिम अवस्थेत जगत आहेत. कोणत्याही प्रकारच्या सुधारणा किंवा विकास त्यांना मंजूर नाही. कोणा परकीय व्यक्तीचा आपल्या मुलुखात झालेला प्रवेशही त्यांना चालत नाही. सरकार आणि तेथील स्थानिक प्रशासन सुद्धा या आदिवासींच्या जीवनामध्ये ढवळाढवळ करत नाही. त्यांना त्यांच्या पद्धतीने जीवन जगू द्यावे अशा प्रकारची भावना आढळते. आणि अर्थातच त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी ती गोष्ट योग्यच आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारची फोटोग्राफी किंवा व्हिडिओ शूटिंग करायचे नाही अशा सूचना आम्हाला देण्यात आल्या होत्या.

इथे आम्ही जे दाट जंगल पाहत होतो, त्यामध्ये खूप उंच उंच वाढणारे गगनचुंबी वृक्ष आम्हाला आढळले. सूर्याचा प्रकाशही त्या जंगलामध्ये जमिनीपर्यंत क्वचितच पोहोचत असावा इतके ते दाट होते. हा प्रवास करताना वाहनात बसूनही त्या दाट जंगलाची, त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी पसरणाऱ्या हिरव्या चादरीची, आणि मधूनच दिसणाऱ्या आदिवासी झलकांची एक अलिखित कहाणी आपल्या मनात उमटत राहते. ते आदिवासी इथे कशाप्रकारे राहत असतील याची कल्पना आपण मनाने करत असतो. आमच्या सोबत असलेला प्रेम नावाचा स्थानिक गाईड आम्हाला येथील आजूबाजूच्या परिसराची माहिती देत होता. **(क्रमश:)**







उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## स्वगुण परीक्षा (ड)


ज्योतिर्मय साहित्य

इति श्री दासबोधे गुरूशिष्य संवादे
स्वगुण परिक्षानाम समास पाचवा ।
श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ।।
दशक तिसरा , समास सहावा
अध्यात्मिक ताप
नमस्कार वाचक मंडळी

समर्थाच्या कृपेने आता पर्यन्त चे समास साध्यासुध्या सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला. अध्यात्म विद्येचा मेरू पर्वत समर्थ किती साध्या भाषेत सांगतात आपलीच आकलन बुद्धी कमी पडते. संत साहित्याचा अभ्यास करत असताना सांख्य हा शब्द मी प्रथम महालक्ष्मीची आरती करताना पाहिला. आणि आता प्रत्यक्ष समर्थाच्या दासबोधाचा अभ्यास करताना सांख्य म्हणजे काय याचे आकलन मला प्रथमच होत आहे त्यासाठी समर्थाचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. वेद विद्येचा जाणता तो एक दासबोध.असे म्हणले तर ते चुकीचे होणार नाही.

मानवी जीवनात दु:ख आहे याबद्दल काडीमात्र संशय नाही. या दु:खाचे आधिभौतिक, अध्यात्मिक अधिदैविक असे तीन भेद करण्याची मूळ कल्पनाच सांख्याची आहे. पुढे वेदाने ती आपली करून घेतली. बाह्य विश्वातील वस्तूचा माणसाच्या इंद्रियाशी संयोग होऊन जी दु:खे भोगावी लागतात ती आधिभौतिक असतात. बाह्य संयोगावाचून ऊद्भवणार्या दु:खांना आध्यात्मिक म्हणतात.

**(क्रमश:)**



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

## नाम हे परमात्मस्वरूप आहे

नाम म्हणजे भगवंताचे नांव. साधन या दृष्टीने देवाच्या निरनिराळया नांवांत फरक नाही. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नामाचा आरंभ सगुणात आहे तर शेवट निर्गुणात आहे. आरंभ सगुणात आहे असे म्हणण्याचे कारण हे की भगवंत मुळात जो निर्गुण निराकार आहे तो जेव्हा सगुणात आला तेव्हाच त्याला नामरूप लागले आणि सगुणरूप नाहीसे झाले तरी नाम शिल्लकच राहिले म्हणून ते निर्गुणही आहे. तेव्हा सगुण आणि निर्गुण भक्तीला आधार नामाचाच आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली वृत्ती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. लग्न झाल्यावर स्त्री जशी नवर्याशी एकरूप होऊन जाते त्याप्रमाणे वृत्तिचे नामाशी लग्न होऊन ती नामरूप बनली पाहिजे. नाम हे अत्यंत सूक्ष्म आहे आणि वृत्तिसुध्दा सूक्ष्म आहे म्हणून नाम घेण्याने वृत्ती सुधारेल, वृत्ती सुधारली की चित्त शांत होईल, चित्त शांत झाले की निष्ठा उत्पन्न होईल. सगळयांचा भावार्थ एकच आहे.

अन्नाला स्वत:ची चव असते त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून नंतर ते खातो. पण नामाला स्वत:ची अशी चव नाही. त्यात आपणच आपली गोडी आणि आवड घालून ते घेतले पाहिजे. आपण जितकी जास्त गोडी त्यात घालू तितके ते अधिक गोड वाटेल. पंढरपूरला जायला पुष्कळ रस्ते आहेत परंतु सर्वांना शेवटी बारीतून जाऊनच दर्शन घ्यावे लागते त्याप्रमाणे इतर साधने जरी केली तरी नामसाधन केल्यावरच आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. आपण नाम घ्यावे ते आपणच आपल्या कानांनी ऐकावे आणि ते घेता घेता शेवटी स्वत:ला विसरून जावे हाच नामसाधनेतला आनंदाचा मार्ग आहे.

जसे आपले आपलेपण आपल्या नांवात आहे तसे देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. आपण आज जे नाम घेतो तेच नाम शेवटपर्यंत कायम राहते परंतु देहबुध्दी जसजशी कमी होत जाईल तसतसे नाम अधिकाधिक व्यापक आणि अर्थगर्भ बनत जाते आणि शेवटी नाम हे परमात्मस्वरूपच आहे असा अनुभव येतो. पाणी हे जसे शरीराचे जीवन आहे तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे की प्राणाबरोबर ते बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे.

१. नामात एका आनंदाशिवाय दुसरे काही नाही.

## ll संत - महात्म्य ll


संकलन : मधुकर बोरीकर
9403061886 (स्त्रोत:- इंटरनेट)

## संत जनाबाई

ज्योतिर्मय साहित्य

अध्यवसायो बुद्धी धर्मो ज्ञान विराग ऐश्वर्यं/
सात्विक मेद्रुपंम् तामसमेतत् विपर्यस्तम्//
( सांख्यशास्त्र)

ज्या बुद्धीत राग द्वेष अविद्या मोह अस्मिता व अभिनिवेश या क्लेशांचे संस्कार शिगेला पोहोचलेले असतात अशा बुद्धीला गीतेत ''अव्यवसायी बुद्धी'' म्हणतात.



जहा कुमती तह वीपदी निराना अशा बुद्धीत विविध वाद मतमतांतरे, शंका, कुशंका, संशय, तर्क, वितर्क या असुरी संपत्तीचे आवेश दिसतात.

आपण स्वत:चे निरीक्षण करुन पाहुयात.आपल्या बुद्धीत अनेक वेळा तर्क वितर्क संशय हे आपण आलेले पाहतो. याचाच अर्थ आपली बुद्धी ही अविद्या किंवा अव्यवसायिकात्मक बुद्धी आहे हे निश्चित.

याचा अर्थ ज्यावेळेस आपण रजोगुणी किंवा तमोगुणी व्हायला लागतो त्यावेळेस राग द्वेश, मोह, अस्मिता अभिनवेश हे चार क्लेश उत्पन्न होतात व या क्लेशांनाच अविद्या असे म्हटलेले आहे. सत्व प्रधान प्रकृतीत भग चार प्रकारचे आहेत ते वैराग्य ज्ञान, ऐश्वर्य व धर्म याप्रमाणे.

साधना करण्याचा मूळ उद्देश हा आपल्या बुद्धीतील, मनातील रक्तातील, रज आणि तम भाव नष्ट करून त्या जागी शुद्ध सात्विक भाव निर्माण करणे हा होय. व हे निर्माण करण्याची प्रक्रिया व वरील अविद्या रुपी चार भेद नष्ट करण्यासाठी जो औषध उपचार करण्यात येतो त्यास योग म्हणतात.

संत जनाबाई यांचा साधन मार्गातील एक अत्यंत उच्च अनुभव त्यांनी या अभंगातून विशद केला आहे.

जेव्हा पंचप्राण एकत्रित येतात तेव्हा ब्रह्मग्नि पेटतो. हा ब्रह्मग्णी किंवा योगाग्नी सुशुमनेतून वर सहस्त्रार चक्राकडे सरकतो, तेव्हा विकारांचे बीज नष्ट व्हायला सुरुवात होते. प्रचंड साधना, नखशिखांत पसरलेला योगाग्णी, उपाशी राहून शरीरातील धगधगता अग्नी सहन करून कित्येक दिवस पूर्ण निष्ठेने, श्रद्धेने आणि उत्तम भाव स्थितीत ही साधना पूर्ण करत गेलो की प्राण मन बुद्धी व अहंकार हे चार ईश्वराचे अंश खाली विषय व्यक्ती व वस्तू यांच्याकडे न वळता उलट बाजूस फिरतात व ते प्राण मन आणि अहंकार हे बुद्धीत विलीन होतात. प्राण उर्ध्वरेता होऊन पूर्ण अग्नीरूप झालेला असतो. मन हे कॉन्सन्ट्रेटेड होऊन विचाराची स्पंदने जवळपास संपल्या जातात.अशा एकवटलेल्या निष्पन्द मनास चित्त म्हणतात. असे चित्त बुद्धीत विलीन झाले की त्याच वेळेस योगाग्णीमुळे काही काळापुरता देह भाव समाप्त होतो. यालाच अहंकार लीन होणे असे म्हणतात. म्हणजे शरीराची जाणीव कमी होत होत संपायला लागते. चित्त प्राण व अहंकार हे बुद्धीत विलीन झाल्यानंतर अशी बुद्धी आत्म्याकडे वळते व आत्म्याचा दिव्य प्रकाश त्यावर पडतो.

**(क्रमश:)**



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**तृष्णां छिन्धि भज क्षमां जहि मदं पापे रतिं मा कृथा:**
**सत्यं ब्रूह्यनुपाहि साधुपदवीं सेवस्व विद्वज्जनम्।**
**मान्यान्मानय विद्विशोऽप्यनुनय प्रख्यापय प्रश्रयं**
**कीर्तिं पालय दु:खिते कुरू दयामेतत् सतां चेष्टितम् ।।**

अर्थ – तृष्णेला छिन्न करा. क्षमेची उपासना करा. अहंकाराचा त्याग करा. पापकर्माची आवड करू नका. सत्यवचन बोला. आपला द्वेष करणारांचाही आदर करा. त्यांच्या प्रति विनम्रभाव व्यक्त करा. कीर्तीचे पालन करा. आर्तजनांवर दया करा. संतांचे हेच तर आचरण असते.

या श्लोकात कवीश्रेष्ठ भर्तृहरींनी संतांच्या श्रेष्ठ आचरणाविषयी सांगीतले आहे. छिन्न तृष्णा, क्षमेची उपासना, त्यक्ताहंकार, पापकर्म विषयक अनभिरुची, सत्यवचन, सर्वांचा आदर, सर्वांप्रती दयाभाव ही संतसज्जनांच्या आचरणाची मुख्य वैशिष्ट्ये असतात, असा आशय कवींनी या श्लोकाद्वारे स्पष्ट केला आहे.





ज्योतिर्मय साहित्य

पत नावाच्या नरका पासून पुत्र रक्षण करतो म्हणून पुत्र हवा असे चिंतन आहे. ऋष्य शृंगाने दशरथाला पुत्र होण्या साठी अश्वमेध व पुत्र कामेष्ठी असे दोन यज्ञकरा म्हणून सांगितले. अश्वमेध यज्ञ केल्याने पुत्र होण्यातील प्रतिबंध नाहीसे होतील व पुत्रकमेष्ठि यज्ञाने पुत्रांचा लाभ होईल. पूर्णाहुती च्या दिवशी यज्ञातून यज्ञ पुरूष प्रकटला.हा प्रसाद राण्यांना प्रसाद द्या असे त्याने दशरथास सांगितले. रावण राजसी वृत्तीचा,कुंभकर्ण तामसी. व बिभीषण हा सात्वीक वृत्तीचा होता. शुर्पनखा जिचे नखे सुपे सारखे ती शूर्पणखा. गुरु व सासऱ्यास सुनेचे नख,केस व दात दिसू नयेत असे धर्म शास्त्र सांगते. तमोगुणामुळे प्रमाद, आळस व निद्रा हे प्राप्त होतात. कुंभकर्णाने ब्रम्ह देवाकडे निद्रा मागून घेतली.रावणाने या,त्या गोष्टीने मरण येऊ नये असा वर मागून घेतला. बिभीषणाने भक्ती मागितली तो सात्विक होता.रावणाने मला मरण कोण कोणा कडून नको याच्या यादीतून दोन नावे अहंकाराने टाकायचे विसरला.ते म्हणजे नर व वानर.रावणाने देवतांना बंदिशाळेत टाकले. नऊग्रह पालथे टाकून त्यावर पाय देऊन रावण सिंहासनावर बसत असे.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

दशरथाच्या तीनही पत्नी गर्भवती राहिल्या.प्रसाद देताना दशरथाने आधी कौसल्याला दिला म्हणून कैकयी रागावली.आता तिचा रुसवा आधी काढू. तिचे डोहाळे पुरवू म्हणून तिला भेटायला दशरथ गेला. ती रूसूनच होती.ती म्हणे मला डोहाळे असे लागले की कनिष्ठास राज्यावर बसवा तर ज्येष्ठास वनी पाठवा. **(क्रमश:)**





## सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुपाचे सेवन करा !!

ज्योतिर्मय साहित्य

सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात. तसेच तूप हा आहाराचा भाग आहे. ज्यामुळे जेवणाची चव वाढते. तसेच आपण तूप चपातीला लावून किंवा खिचडीवर घालून तुपाचे सेवन करतो. त्यामुळे जेवणाची अजून चव वाढते. तुपाचे सेवन केल्याने जेवणाची चव वाढते त्याचबरोबर अनेक आजरांवर देखील तूप खूप फायदेशीर आहे. चला तर मग जाणून घेऊया रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने काय फायदे होतात.

तुपाचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते. जर तुम्हाला पचनाशी संबंधित काही समस्या असतील तर तुम्ही सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुपाचे सेवन करू शकता.

जेव्हा तुम्ही रिकाम्या पोटी तुपाचे सेवन करता त्यावेळी अनेक आजारांशी संबंधित समस्या सुधारते. जर तुम्हाला झोप न येणे, भूक न लागणे अशी लक्षणे दिसून आल्यास तुम्ही तुपाचे रिकाम्या पोटी सेवन करू शकता.

जर तुम्ही सकाळी उठल्यावर रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केले तर हाडे मजबूत होतात. सांधे दुखीवर लगेच आराम देखील मिळू शकतो.

त्वचेला खाज येणे, त्वचा कोरडी पडणे, त्वचेवर फोड्या येणे, इत्यादी समस्या तुम्हाला जाणवत असतील तर तुम्ही दुधा मध्ये तूप मिक्स करून त्याचे रिकाम्या पोटी सेवन करा. त्यामुळे त्वचेचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. तुपामुळे त्वचा चमकदार होते.

आतड्याचे आजार सुधारण्यासाठी तुम्ही रिकाम्या पोटी तुपाचे सेवन करू शकता. जर तुम्हाला बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल तर तुम्ही तुपाचे सेवन आवर्जून करा.


तुपामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. जे केसांच्या आरोग्यासाठी खूप उत्तम आहे. रिकाम्या पोटी तुपाचे सेवन केल्याने केस घनदाट होतात. आणि त्यामुळे केसगळती देखील थांबते. केस सुंदर आणि मुलायम होतात.


तुपाचे सेवन केल्याने भूक जास्त काळ टिकून राहते. आणि सतत भूक देखील लागत नाही. आणि वजन देखील नियंत्रणात राहते. म्हणून तुपाचे सेवन आवर्जून करा.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## रवींद्रनाथ टागोर






विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

### रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

रवींद्रनाथांनी ज्या ज्या साहित्याच्या प्रांतात आणि कलेच्या शाखेत स्वच्छंदपणे मुशाफिरी केली, त्याचा यथाशक्ती आढावा आपण घेत आहोत. खरे तर त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांचे साहित्य यांची व्याप्ती सागरासारखी अमर्याद आहे. त्याचा थोडक्यात आढावा घेणे म्हणजे ओंजळीत समुद्र घेण्याचा प्रयत्न करण्यासारखेच आहे. या आधीच्या काही भागांमध्ये आपण त्यांच्या कविता, कथा आणि कादंबरी याबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या भागात या आणि पुढील भागात आपण त्यांच्या नाटकांबद्दल जाणून घेण्याचा प्रयत्न करूया.

भारतीय नाट्यसृष्टीत रवींद्रनाथांचे योगदान एवढे प्रचंड आहे की त्यांना भारतीय नाट्यसृष्टीचा तारणहार म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. रवींद्रनाथ ज्या कालखंडात जन्माला आले आणि वाढले त्या कालखंडामध्ये आपल्या देशावर इंग्रजांची सत्ता होती. भारतावर राज्य करण्यासाठी आपल्या देशाची सांस्कृतिक अस्मिता नष्ट करणे त्यांना आवश्यक वाटत होते आणि त्यांनी सर्व बाजूंनी तो प्रयत्न केला. त्यातून पूर्वीच्या काळी समृद्ध परंपरा असलेल्या भारतीय रंगभूमीला ग्रहण लागले होते. पण रवींद्रनाथ म्हणजे चालती बोलती नाट्यसंस्था होती असे म्हटले तरी चालेल त्यांच्या रूपाने भारतीय रंगभूमीला संजीवनी मिळाली आणि ती पुन्हा भक्कमपणे पाय रोवून उभी राहिली. कोलकत्यातील रवींद्रनाथांचे निवासस्थान जोराशंकोवाडी म्हणजे सांस्कृतिक कार्यक्रमाचे माहेरघरच होते. कलेची आणि साहित्याची आवड या कुटुंबात पूर्वापार होतीच. ती रवींद्रनाथांकडे वारशाने आली. त्यांचे मोठे बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांना नाटकाची प्रचंड आवड होती. त्यांच्या नाटकांमध्ये भूमिका करता करता रवींद्रनाथ पुढे स्वतःही नाटके लिहू लागले. वयाच्या केवळ १२ व्या वर्षीच त्यांनी शेक्सपियरच्या मॅकबेथ या नाटकाचे भाषांतर केले होते. ही गोष्ट त्यांच्या रक्तात नाटकाची आवड लहानपणापासूनच किती भिनली होती हे दर्शवते. त्यांनी काव्यलेखनाला जेवढा न्याय दिला तेवढाच नाटकांना देखील दिला. त्यांनी केवळ नाटके लिहिलीच नाहीत तर आपण लिहिलेल्या नाटकांमध्ये भूमिका करणे, ती नाटके विविध कलाकारांकडून बसवून घेणे, त्याचे दिग्दर्शन करणे इत्यादी गोष्टी त्यांनी शेवटपर्यंत आवडीने केल्या. त्यांना अगदी नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतरही शांतिनिकेतन मध्ये सादर होणाऱ्या नाटकांमध्ये ते स्वतः भूमिका करीत असत. त्यांच्या नाटकांची नेमकी संख्या किती आहे हे अधिकृतपणे सांगता येत नसले तरी ती ५० ते ५२ असावी. याशिवाय ज्या नाटकांची त्यांच्या लिखित साहित्यात नोंद नाही अशी आणखीही काही अप्रकाशित किंवा अप्रसिद्ध नाटके असू शकतील.







# वाढत्या पाणी समस्येवर तोडगा म्हणून जलप्रबोधनाची नितांत गरज

## जलतज्ज्ञ जयकुमार भोयरेकर यांचे प्रतिपादन

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** महाराष्ट्रातील वाढती पाणीटंचाई आणि मराठवाड्यासारख्या प्रदेशातील पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी आपणास भविष्यकाळात जलसाक्षरतेवर अधिक भर द्यावा लागेल, असे प्रतिपादन निवृत्त कार्यकारी अभियंता आणि शासनाच्या जलसमितीचे माजी सदस्य जयकुमार भोयरेकर यांनी केले. रविवारी, ४ रोजी एम-२ सिडकोतील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना महाराष्ट्रातील जलसमस्या व जलसाक्षरता या विषयावर ते बोलत होते. मागील महिन्यात पहिले पुष्प सिडको वॉकर्स क्लबचे अध्यक्ष शिवाजीराव रामरूले यांनी संघ आणि सामाजिक जबाबदारी या विषयावर गुंफले.

जयकुमार भोयरेकर पुढे म्हणाले, सध्याच्या कडक उन्हाळ्यात जायकवाडीतील पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. बारा दिवसांतील बाष्पीभवनामुळे सहा गावांच्या तोंडचे पाणी पळते म्हणजे त्यांना पाण्यापासून वंचित राहावे लागते. भोयरेकर यांनी मराठवाड्यातील पाणीपातळी का व कशी घटत आहे, यावर प्रकाश टाकला. येणाऱ्या पावसाळ्यामध्ये प्रत्येकाने वाहून जाणारे पाणी साठविण्याचा आणि भूजलामध्ये त्याचा पुन्हा समावेश करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंगचा साधा, सोपा आणि योग्य मार्गाचा अवलंब करावा. आपल्या भाषणात त्यांनी प्रामुख्याने इस्त्राईलमधील प्रयोगांची माहिती दिली. इस्त्राईलमध्ये खडकाळ भूमीमध्ये लोकांनी उपलब्ध जलस्त्रोतांचा उपयोग करून हरितक्रांती घडवून आणली. हॉलंडमध्ये सागर किनारी तट उभारून लोकांनी सागरी पाण्याचा उपयोग करून नव्या पद्धतीने वाहतूक तंत्र विकसित केले आहे. पाणी उपसण्यासाठी पवनचक्क्या बसविल्या आणि त्यातून उर्जा निर्मितीसुद्धा केली. हॉलंडचा हा प्रयोग मराठवाड्यासारख्या भागामध्ये पवन उर्जेसाठी कसा उपयुक्त आहे, असेही त्यांनी सांगितले. कॅनॉलमधून वाहून जाणारे पाणी आणि त्यातील मोकळ्या जागेवर सौरपॅनल बसवून आपण त्याआधारे विद्युत निर्मिती करू शकतो. स्वच्छ उर्जा आणि माफक उर्जा हे धोरण कृतीमध्ये आणण्यासाठी लोकशिक्षणाची गरज आहे. त्यांनी क्रॉप पॅटर्न व पीक लागवड प्रणाली कशी बदलली पाहिजे हे सांगताना असे सूत्र मांडले की, कॅश क्रॉपच्या मागे न लागता आपण पाण्याचा माफक उपयोग केला पाहिजे. एक एकर उसासाठी आपण विहिरीतील पाणी उपसतो, सिंचनाला पाणी वापरतो त्यामुळे भूजलपातळी खालावते. पर्यायी पीक म्हणून आपण अन्य पिकांची निवड केल्यास त्यातून शेतीचे उत्पन्न वाढेल आणि जलसमस्यासुद्धा उद्भवणार नाही, असे ते म्हणाले.

वैजापूर, गंगापूर या पर्जन्यछायेच्या प्रदेशात कुठे व कशा विहिरी घ्याव्यात, याबद्दलही त्यांनी मौलिक मार्गदर्शन केले. प्रारंभी या शाखेतील स्वयंसेवक व कार्यकर्ते डॉ. विजय धारूरकर यांनी भोयरेकर यांचा परिचय करून दिला. नगर संघचालक बबनराव जगाडे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. याप्रसंगी डॉ. रामदास सपकाळ, नगर बौद्धिक प्रमुख बाळकृष्ण बाभूळगावकर, कार्यवाह विवेक कंडारकर, गंगाजळी प्रमुख प्रकाश राजेंद्र, दंबारे गुरूजी, मुख्य शिक्षक उल्हास देशमुख, विजय जोग यांच्या सह केशव प्रभात शाखेतील ५० स्वयंसेवक बहुसंख्येने उपस्थित होते. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय होती. शेवटी कंडारकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.



# भाषा ही संस्कृतीची आस्था असल्याने तीचा धर्माशी काहीही संबंध नाही

ज्योतिर्मय साहित्य

भारतातील प्रत्येक भाषा संस्कृतीच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आहेत; ज्याप्रमाणे गंगा,यमुना,कावेरी,गोदावरी, तापी, कृष्णा, नर्मदा इत्यादी अनेक नद्यांच्या सोज्वळ आणि निर्मळते मधुनच भारतीय भाषेचा उगम झाला आहे. त्यामुळे त्याला धर्माशी जोडता येणार नाही.आपण जगात कुठेही जा परंतु भारतीय संस्कृती,भाषा,वेगवेगळे रहाणीमान, खानपान, व्यंजनाचे वेगवेगळे प्रकार या संपूर्ण परंपरा हजारो वर्षांपासून भारतातुनच निर्माण झालेले वटवृक्ष आहे आणि तीच परंपरा आताही सुरूच आहे.भाषा ही विचारांच्या देवाणघेवाणीचे एक मोठे माध्यम आहे.तिच्या माध्यमातून विविध आचार-विचार आणि श्रध्दा असलेले लोक जोडले जातात.ती त्यांच्या विभाजनाचे कारण बनू नये,अशी अपेक्षा व्यक्त करत नगरपरिषदेच्या क्षेत्रात राहणारे लोक किंवा लोकांचा समूह उर्दू भाषेशी परिचित असेल तर किमान नगर परिषदेच्या फलकावर अधिकृत भाषेव्यतिरिक्त म्हणजेच मराठी व्यतिरिक्त उर्दू वापरल्यास कोणताही आक्षेप नसावा असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.भारतात अनेक धर्मांचे लोक रहातात.त्यामुळे भाषा आणि धर्म याचा कुठेही संबंध जुळुच शकत नाही.कारण भारतात २८ राज्य व ८ केंद्रशासित प्रदेश आहेत त्या-त्या अनुषंगाने भाषेचे सुध्दा वर्णन होत असते. उदाहरण द्यायचे झाले तर महाराष्ट्रांतील मराठी, गुजरात मधील गुजराती, तामिळनाडू मधील तामिळ अशा प्रकारे प्रत्येक राज्यात भाषेचे आगळेवेगळे रूप दिसुन येते व त्याची गणना समाजामध्ये होते.त्याचप्रमाणे उर्दू भाषेचा जन्म सुद्धा भारतातील आहे तिचा धर्माशी काहीही संबंध नाही. इंग्रजी भाषा ही इंग्रजांनी भारतावर लादलेली भाषा आहे.त्यामुळे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील संपूर्ण भाषांची नाळ भारतभूमीतच गाडली आहे. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यातील पातूर नगरपरिषदेतील फलकावर उर्दू भाषेच्या वापराला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली ''उर्दू भाषा हा धर्म नाही.ही लोकांमध्ये फूट पाडण्याचे कारण बनू नये.उर्दू हे गंगा-यमुना संस्कृती (गंगा-जमुनी तहजीब) किंवा हिंदुस्थानी संस्कृतीचे उत्तर उदाहरण आहे, असे हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.भाषा म्हणजे कोणताही धर्म नाही ती धर्माचे प्रतिनिधित्वही करीत नाही असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. भाषा म्हणजे एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप आहे.उत्तर आणि मध्य भारतातील मैदानी भागांचे मिश्र सांस्कृतिक स्वरूप असलेल्या गंगा-यमुना संस्कृती किंवा हिंदुस्थानी तहजीबचे उत्तम उदाहरण असलेल्या उर्दूच्या बाबतीतही हेच आहे.सर्वोच्च न्यायालय म्हणतो की, उर्दू ही भारतासाठी परकी आहे, या गैरसमजातून उर्दूविषयीचा पूर्वग्रह निर्माण झाला आहे.उर्दू हीदेखील मराठी आणि हिंदीप्रमाणेच इंडो-आर्यन भाषा आहे व या भूमीत जन्माला आलेली ही भाषा आहे अशा स्पष्ट शब्दात सांगितले.भाषेचा विरोधच करायचा असेल तर इंग्रजी भाषेचा करावा आणि करायला पाहिजे. कारण देशातील इतर भाषांना इंग्रजी भाषा पोखरत असुन देशात घर करण्याचा प्रयत्न करीत आहे याकडे भारतीयांनी लक्ष देण्याची गरज आहे. आज भारतातील प्रत्येक राज्यातील वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.याहीपलीकडे आपण गेलो तर प्रत्येक राज्याच्या ४० किलोमीटर अंतरानंतर आपल्याला तेथील भाषा,रहनसहन आणि संस्कृती यांचेही आगळेवेगळे दर्शन होते.म्हणजे इंग्रजी भाषा सोडली तर भारतातील प्रत्येक भाषा हिंदुस्थानच्या रक्तात आणि



नसानसामध्ये दिसून येते.त्यामुळे उर्दू भाषा भारतीयांसाठी नवीन नसुन ती आपलीच आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे. भारतातील प्रत्येक भाषा ही दैवी देण असुन ती सर्वांनीच स्विकारली पाहिजे.कारण हिंदू,बौद्ध,शिख, ईसाई, मुस्लिम या संपूर्ण धर्मांच्या साधुसंतांनी, महाज्ञानी, तपस्वी यांच्या परिश्रमातूनच भारतातील प्रत्येक भाषेचा उगम झाला आहे व ते सर्वांचेच श्रध्दा स्थान आहे.त्यामुळे भारतातील कोणतीही भाषा धर्माशी जोडली जावू शकत नाही.भाषा ही ईश्वरी देण आहे तीचा आदर व्हायलाच पाहिजे.त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक राज्यांनी आपापल्या राज्यातील भाषेचा वापर जास्तीत जास्त करावा यामुळे प्रत्येक राज्यातील मातृभाषा सुरक्षित राहील.कारण मातृभाषा ही कोणाही कडून शिकविली जात नाही ती जन्मताच अवगत होत असते म्हणूनच तिला मातृभाषा म्हटल्या जाते. त्यामुळे देशातील संपूर्ण भाषा, मातृभाषा आणि राष्ट्रीय भाषेचा आदर सर्वांनीच केला पाहिजे.यामुळे देशातील संपूर्ण भाषा व बोली सुरक्षित राहील. जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर
***

# पसायदान हस्ताक्षर लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा संपन्न



ज्योतिर्मय साहित्य

**पुणे –** अभिज्ञान, पुणे आयोजित ''पसायदान हस्ताक्षर लेखन स्पर्धेचा'' पारितोषिक वितरण समारंभ वीर बाजी पासलकर सभागृह पुणे येथे उत्साहात पार पडला. संस्कारक्षम अक्षरलेखन आणि सृजनशील अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या या उपक्रमात विविध वयोगटातील स्पर्धकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.

या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून कल्याणी कदम-केळापुरे, व्यवस्थापिका, लोकमत जाहिरात विभाग, पुणे, आणि प्रा. डॉ. अनिता खैरे, ज्ञानगंगा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पुणे उपस्थित होत्या. अभिज्ञान संस्थेच्या संचालिका सौ. मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर आणि डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर उपस्थित होते. या प्रसंगी ह.भ.प. श्री. दुर्गादासशास्त्री सोनपेठकर, सौ. भाग्यश्री सोनपेठकर, जवाहर खळदकर आदी मान्यवर विशेष उपस्थित होते.

समारंभाची सुरुवात स्वागत व प्रतिमा पूजनाने झाली. सौ. मानसी सोनपेठकर यांनी स्पर्धेची भूमिका मांडून, या उपक्रमामागील उद्दिष्टे स्पष्ट केली. प्रमुख पाहुण्यांनी प्रेरणादायी भाषणातून आत्मविश्वास, सृजनशीलता आणि अभिव्यक्ती यांचे महत्त्व व्यक्त केले. या प्रसंगी अभिज्ञानच्या विविध उपक्रमांत परीक्षण कार्य करणारे डॉ. रंजना दाते करंदीकर, प्रा. उज्ज्वला धर्माधिकारी, सौ. कमला खळदकर, चिरंतन कुलकर्णी, सौ. रोहिणी पांडे, कु. गिरीजा वाडीकर आदींचा सत्कार करण्यात आला.

विजेत्या स्पर्धकांना पारितोषिके देण्यात आली. त्यांच्या नावाची घोषणा करताना सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. विजेत्यांचे कौतुक करताना उपस्थितांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांनी आभार प्रदर्शन केले. सहभागी स्पर्धक, पालक, परीक्षक आणि पाहुण्यांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. राधिका सातपुते हिने केले.

कार्यक्रमाची सांगता मैत्रेयीच्या पसायदान सादरीकरणाने झाली. संपूर्ण समारंभ उत्तम नियोजन, सुंदर सूत्रसंचालन आणि सुसंस्कृत वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. शीतल सातपुते, बाळासाहेब खैरे, कनिष्का खैरे, योगेश केळापुरे, कुश केळापुरे, केतन गायकवाड आदींचे विशेष सहकार्य लाभले. तसेच कार्यक्रमाच्या प्रसिद्धीसाठी संजय व्यापारी, संपादक, ज्योतिर्मय यांचे विशेष सहकार्य लाभले.




# श्रीयश प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची धूत इलेक्ट्रिकल सिस्टिम्सला औद्योगिक भेट

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर (शेंद्रा) –** श्रीयश अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या बी.टेक प्रथम वर्ष विद्युत व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर शाखेच्या विद्यार्थ्यांनी नुकतीच धूत इलेक्ट्रिकल सिस्टिम्स लिमिटेड, शेंद्रा येथे औद्योगिक भेट दिली.

या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना औद्योगिक वातावरण, कार्यपद्धती व उत्पादनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा असा होता. सुरुवातीला कंपनीचे मनुष्यबळ मॅनेजर यांनी विद्यार्थ्यांना कंपनीचा इतिहास, मूल्ये, उत्पादने, कार्यपद्धती व उत्तम व्यवस्थापन पद्धतींबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उत्पादन विभागात हार्नेस चे उत्पादन व गुणवत्ता नियंत्रण प्रक्रिया जवळून पाहिली.

यावेळी प्लांट हेड व कॉर्पोरेट मनुष्यबळ हेड यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांना उद्योग क्षेत्रातील ज्ञान व मार्गदर्शन दिले. एकूण ४९ विद्यार्थ्यांनी या भेटीत सहभाग घेतला.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी या उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले व कंपनी व्यवस्थापनाचे आभार मानले की, त्यांनी विद्यार्थ्यांना अशी मौल्यवान संधी उपलब्ध करून दिली.

# झाडांवर बोलू काही

ज्योतिर्मय साहित्य

आईच्या कुशीतून बाहेर पडून पहिले बाळघास खाताना पाहिली ओळख झाली ती लिंबोणीच्या झाडामागे लपलेल्या चंद्राची. बहुतेक दूरवर दिसणाऱ्या चंद्रापेक्षा माझ्या मनात बसले ते चंद्रचुऱ्यात रंगलेले ते झाडं जे मला आपल्या सावळछायाने झुलवीत खेळवत होते मग नंतर पैंजण नाद करणारी माझी पाऊले परसात फुला पानांनी आणि पक्ष्यांनी बहरलेल्या झाडांच्या संगतीत जास्त रमू लागली. नंतर तुळस, वड, पिंपळ, आवळा अशी काही झाडे पारंपरिक कथेमधून अजून जवळ आली. चिंचेच्या झाडात न बघितलेला चिनार वृक्ष दिसू लागला. सगळ्या प्रकारच्या फुल, फळ झाडांचा रंग गंधाचा पिंगा नेहमीच मनात फिरत राहिला.

मी जसजशी मोठी होत गेले तशी या सुंदर झाडांच्या संख्येत वाढ होत चालली. वय वाढेल तशी त्यांची शास्त्रीय माहिती उपयोग ही कळू लागले. प्रत्येकाचे रंगरूप, उपयोग वेगवेगळे पण सगळ्यांमध्ये एक साम्य होते ते म्हणजे कुठल्याच अपेक्षेविना केवळ देत रहायचे..यामध्ये प्राणवायू, सावली, फळे, फुले, पाने , साल या सगळ्यांमधून त्याच्या सौंदर्याचा आणि सुगंधांचा आनंद तर भरभरून मिळतोच पण औषधे,लाकूड, डिंक, अत्तर, मसाले पक्ष्यां /प्राण्यांना निवारा अशा अनेक गोष्टी ही झाडे सर्वांना भरभरून देत राहतात हे उमजू लागले.ऋतूंशी जुळवून घेत फुलत राहतात. ही सगळी झाडे मला आनंद आणि समाधानाबरोबर बरोबरच खूप सहजतेने खूप काही शिकवत राहिली.या सगळ्यासाठीच मी त्यांची मनापासून कृतज्ञ आहे.मला प्रत्येक झाडाला आदराने आणि प्रेमाने सांगावे वाटते...

जन्मापासून लाभला तुझा सुखद सहवास
तुझ्यामुळेच आहे नित्य प्रसन्न माझा श्वास
क्षणोक्षणी तुझ्याकडून मी शिकत राहिले
आदरणीय प्रेमळ गुरु तू माझा आहेस खास..

आयुष्याच्या वळणावर अनेक नाती आली गेली, काही चांगले वाईट अनुभव आले.पण या झाडांची सुसंगत आणि निर्भेळ मैत्र मात्र आजपर्यंत तसेच राहिले.देश/विदेशातील झाडांच्या मैत्र संख्येत भर पडत गेली. जी प्रत्यक्ष आणि आठवणीतही मला आनंदच देतात..पण मी मात्र अगतिकतेने त्यांची परवड वाचत,बघत राहते.


सौ.माधुरी म.इनामदार
मिरज

माणसांनी प्रगतीच्या नावाखाली अनेक झाडांची कत्तल केली आहे. जंगलांना आग लावली आहे.अजूनही झाडे तोड वाढतच चालली आहे. त्यामुळे ऋतुचक्र बदलले आहेच तसेच प्रचंड पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.झाडे तोडल्याने प्राण्या/पक्ष्यांच्या संख्येतही लक्षणीय घट झाली आहे. कारण त्यांचा निवारा काढून घेतला जातोय. किती दुर्दैव आहे हे आपले.

सध्य परिस्थितीत असे मी म्हणू शकते अती संपत्तीच्या मागे लागल्याने आणि स्वार्थामुळे पुढच्या पिढीचा विचारच केला जात नाही आहे.झाडातली तसेच मनातलीही हिरवाई करपत चालली आहे.

काही हात हे सगळे थांबविण्यासाठी नक्कीच पुढे येत आहेत पण सध्या त्याचे प्रमाण खूप कमी आहे.या सगळ्यासाठी मनामनात वैचारिक ज्योत पेटविणे अत्यंत आवश्यक आहे.पण इथे केवळ चर्चा, आंदोलने होतात. ठोस पाऊले उचलली जात नाहीत. गुन्हा करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केली जाते पण योग्य न्याय वेळेत दिला जात नाही त्यामुळे हे झाडांचे संपणे वाढतच चालले आहे.


पुढचे भविष्य काय असेल याची मला कल्पना नाही. केवळ झाडांच्या शुभ भविष्याची प्रार्थना करणे एवढेच हाती राहिले आहे.

मातीचे झाड : झाडाची मी : माझी पुन्हा माती
याच्या पानांवरच्या रेषा माझ्या तळहाती
ढलपी, ढलपी सुटून मुळे झाली सैल
रुजते आहे झाड माझ्या रक्ताच्याही पैल
कधीतरी एके दिवशी मीच झाड होईन
पानांमधून ओळखीचे जुने गाणे गाईन

या शांता शेळके यांनी लिहिलेल्या कवितेतील काही ओळींच्या भावनेशी मात्र मी मनापासून एकरूप आहे..

# स्मृती शिंपल्यातील आठवणीचे मोती-२

ज्योतिर्मय साहित्य


आठवणी...
श्याम वा. कुलकर्णी, पुणे
मो. 98238 09656

कंधारचे माजी आमदार स्व.श्री.भाई केशवरावजी धोंडगेशे.का.पक्षाचे लढवय्ये नेते व विधान सभागृहातील मुलूख मैदानी तोफ म्हणून सर्व परिचित होते. दुर्लक्षित जनतेचे प्रश्न मार्गी लावणारे

नेते आणीबाणी काळात १४ महिने नासिकच्या तुरुंगात शिक्षा भोगलेले. त्यांनी आपल्या सच्चा व लढवय्या समर्थाकाची फौज निर्माण केलेली होती. त्यापैकीच श्री. शंकररावजी जाधव हे कंधार पंचायत समितीचे सभापतीपदी विराजमान होते. घटना जूलै १९८९ ची आहे. कंधारच्या कांही भागात घटसर्पाची तिव्र साथ चालू होती. त्यामुळे कंधारच्या प.वै.दवाखाना लगतच्या परिसरात घरोघर जाऊन लसीकरण करण्याचे नियोजन केले. भवानी नगर हा जवळचा व सुखवास्तू नागरिकांचा भाग होता. चतूर्थ वर्ग कर्मचार्यावर लसीकरण करण्याची जबाबदारी सोपवून मी ओपीडी वर येणारे रुग्णोपचार केला.

पण माजी सभापद उपभोगलेले भाई श्री. शंकररावजी जाधव यांची एक दुभती म्हैस लसीकरण करताच चक्कर येवून दगावली. त्यांच्या घरातील वातावरण गंभिर झाले होते. प्रामाणिकपणे कार्य करणारा शे. इस्माईल कम्पाऊंडर बाबत सर्वजण त्वेषाने बोलत होते. व नुकसान भरपाईची भाषा बोलत होते. मला घटना समजताच मी घटनास्थळी गेलो. व मी शवचिकित्से साठी गांवा बाहेरील निर्जन स्थळ हत्ती नाल्या या निर्जण स्थळी मृत म्हैस नेली. मेलेल्या गुरांचे कातडी कौशल्य पुर्वक शरीरा पासून वेगळे करुन पादत्राणे बनवण्या साठी विक्री करणारे लोक पण सध्य परिस्थितीत जवळपास नाहीतच! त्या काळी सहज उपलब्ध असत. त्यांनी कातडी शरीरा वेगळे करुन उदर पोकळी छातीचा भाग ओपन केला. तेंव्हां एक जाड व गोदडी शिवायची सुई डायफ्राम (उदर पोकळी व छातीचा घेर वेगळा करणारा पडदा ) मधून हृदयात टोचल्या गेलेली दिसली ज्या मुळे हृदय क्रिया बंद पडून म्हैस दिवंगत झाली.....ती सुई म्हैस मालकाच्या हातात सोपवली व क्षणार्धात गंभीर असलेले वातावरण बदलून गेले. व पशुपालकांनी चहा-पाणी करुन मन:स्ताप कमी केला व गंभिर वातावरण हास्य विनोदात बदलले. या प्रसंगातून भाई श्री.शंकरराव जाधव बरोबर मैत्रीचे नाते निर्माण झाले होते ते कंधार वास्तव्यात शेवट पर्यंत होते !

# वैभव सूर्यवंशी : भारतीय क्रिकेटचे भविष्य

ज्योतिर्मय साहित्य

आयपीएल म्हणजे रत्नांची खाण असे म्हंटले जाते कारण दरवर्षी आयपीएल मध्ये असे काही नवीन रत्न उदयास येते की ज्या रत्नांनी संपूर्ण क्रिकेट विश्वच उजळून निघते. अशाच एका उगवत्या रत्नाने केवळ भारतीय क्रिकेटच नव्हे तर संपूर्ण क्रिकेट विश्वच उजुळून निघाले आहे आणि हे रत्न आहे अवघ्या १४ वर्षाचं आणि त्याचं नाव आहे वैभव सूर्यवंशी. सध्या आयपीएलमध्ये वैभव सूर्यवंशी या १४ वर्षाच्या मुलाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे अर्थात त्याने तसा कारनामा ही करून दाखवला आहे. मूळचा बिहार राज्यातील असलेला वैभव सूर्यवंशी हा अवघा १४ वर्षाचा युवा खेळाडू आहे. राजस्थान रॉयल्स या संघाने ज्यावेळी त्याच्यावर १ कोटी १० लाखांची बोली लावून त्याला आपल्या संघात घेतले त्याच वेळी त्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्स संघाने या १४ वर्षाच्या मुलावर इतका मोठा दाव का लावला असा प्रश्न विचारला गेला त्याचे उत्तर शोधण्यासाठी थोडं मागे जावे लागेल. वैभव सुर्यवंशीने १२ व्या वर्षीच बिहार कडून १९ वर्षाखालील संघातून विनू मंकड चषक स्पर्धेत भाग घेतला. तिथे त्याने चांगली कामगिरी केल्याने त्याची निवड बिहारच्या रणजी संघात करण्यात आली. बिहारकडून रणजी स्पर्धेत खेळणारा सर्वात कमी वयाचा तो खेळाडू ठरला. १३ व्या वर्षी वैभवने विजय हजारे चषकात धावांचा रतीब घातला त्यामुळे त्याची भारताच्या १९ वर्षाखालील ब संघात निवड झाली. चार संघात झालेल्या स्पर्धेत त्याने ६ डावात १७७ धावा काढल्या त्यात त्याने दोन अर्धशतके झळकावली त्यामुळे ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारताच्या १९ वर्षाखालील मुख्य संघात त्याची निवड झाली. १९ वर्षाखालील कसोटीतील पदार्पणाच्या सामन्यात त्याने अवघ्या ५८ चेंडूत शतक झळकावले त्यावेळी त्याचे वय १३ वर्ष होते. त्यानंतर १९ वर्षाखालील आशिया कप स्पर्धेत तर त्याने धुमाकूळ घातला. तिथे युएई विरुद्ध त्याने ४६ चेंडूत ७६ धावा काढल्या तर उपांत्य फेरीत श्रीलंके विरुद्ध ३६ चेंडूत ६७ धावा काढल्या. या स्पर्धेपासून त्याची सर्वत्र चर्चा होऊ लागली. ही चर्चा राजस्थान रॉयल्स संघाच्या पदाधिकाऱ्यांना समजली. त्यांनी त्यांचा बॅटिंग कोच असलेल्या विक्रम राठोडला वैभव सूर्यवंशीची फलंदाजी पाहण्यास सांगितली. विक्रम राठोड यांनी वैभवला खेळताना पाहिले आणि त्याला आपल्या संघात घेण्याचे निश्चित केले. त्यांचा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड हा तर नवोदित खेळाडूंना संधी देण्यास प्रसिद्ध आहे. त्याने देखील वैभवची फलंदाजी पाहिली आणि त्याला संधी देण्याचे ठरवले आणि अशा प्रकारे त्याची राजस्थान संघात एन्ट्री झाली. आयपीएल सुरू झाली पण सुरुवातीच्या काही सामन्यात वैभवला संधी मिळाली नाही. लखनऊ या संघाविरुद्ध राजस्थान रॉयल्सने त्याला संधी दिली. वैभव या संधीची वाटच पाहत होता. त्याने या संधीचे सोने करायचे ठरवले आणि पहिल्याच चेंडूवर त्याने अनुभवी शार्दुल ठाकूरला पुढे सरसावत षटकार खेचला आणि सर्वांना चकित केले. या सामन्यात त्याने २० चेंडूत ३४ धावा


श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

काढून आपल्या आयपीएल कारकिर्दीची धडाकेबाज सुरुवात केली. दुसऱ्या सामन्यातही त्याने चांगली खेळी केली मात्र आपल्या तिसऱ्या सामन्यात तर त्याने कमाल केली. गुजरात टायटन्स विरुद्धच्या या सामन्यात त्याने केवळ ३८ चेंडूत १०१ धावांची धमाकेदार खेळी करत शतक झळकावले. या शतकासोबत त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. तो आयपीएल इतिहासातील सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा खेळाडू ठरला. केवळ आयपीएलच नाही तर टी २० क्रिकेट इतिहासात सर्वात कमी वयाचा शतक झळकावणारा तो खेळाडू ठरला. आयपीएलमध्ये सर्वात कमी चेंडूत शतक झळकावणारा तो भारतीय ठरला. त्याने अवघ्या ३६ चेंडूत शतक झळकावत युसुफ पठाणचा विक्रम मोडला. एका सामन्यात त्याने सर्वाधिक षटकार मारणारा भारतीय खेळाडू ठरण्याचा विक्रमही त्याने आपल्या नावावर केला. या सामन्यात त्याने ११ षटकार खेचले ते ही ईशांत शर्मा, मोहम्मद सिराज, वॉशिंग्टन सुंदर आणि राशिद खान या आंतरराष्ट्रीय खेळाडूंविरुद्ध. त्याच्या या धडाकेबाज खेळीने सर्व आजी माजी खेळाडू आणि क्रिकेटप्रेमींनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेटचा देव म्हणून ओळखला जाणारा सचिन तेंडुलकरने वैभवच्या खेळीवर ट्विट केले की '' वैभवची निडर शैली, उत्कृष्ट बॅट स्पीड, चेंडूची लांबी पटकन ओळखण्याची क्षमता आणि चेंडूच्या मागे ताकद लावण्याची तयारी, या सर्वांचा संगम त्याच्या धमाकेदार खेळीमागे होता. ३८ चेंडूत १०१ धावा जबरदस्त कामगिरी. जबरदस्त खेळ....!''

केवळ सचिन तेंडुलकरच नव्हे तर अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याच्या कौतुकाचे इमले बांधले. केवळ खेळाडूच नव्हे तर क्रिकेट प्रेमींनीही त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. क्रिकेट प्रेमींनी त्याच्या या खेळीचे व्हिडिओ, फोटो सोशल मीडियावर शेअर करत त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. मीडिया तर त्याच्यावर फिदाच झाली. त्याच्या या खेळीने त्याने आपण भारताचे भविष्य आहोत हे दाखवून दिले आहे. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात या म्हणीप्रमाणे त्याने लहान वयातच आपण कोण होणार हे दाखवून दिले आहे. त्याच्या या लाजवाब खेळीने त्याच्यावर अचानक प्रसिद्धीचा झोत आला आहे. वैभवने मात्र या झगमगाटाकडे दुर्लक्ष करून खेळावर लक्ष केंद्रित करायला हवे. त्याला आणखी यशोशिखरे गाठायची असेल तर त्याने झगमगाटापासून दूर राहिलेलेच बरे. प्रसिद्धीच्या झगमगाटात वाहत जाऊन आपल्या करिअरचे मातेरे करणारे अनेक खेळाडू आपण पाहिले आहेत. विनोद कांबळी, पृथ्वी शॉ ही त्याची बोलकी उदाहरणे आहेत. वैभवने आपल्या खेळावर लक्ष केंद्रित करून आणखी मेहनत केल्यास तो भारतीय क्रिकेटचे भविष्य ठरेल यात शंका नाही. वैभवला खूप खूप शुभेच्छा !

# साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार २०२५ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

ज्योतिर्मय साहित्य

नवी दिल्ली – साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार वर्ष २०२५ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे.

साहित्य अकादमीमार्फत १९८९ पासून मान्यताप्राप्त २४ भारतीय भाषांपैकी प्रत्येकी २४ भाषांमध्ये साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार प्रदान करण्यात येत आहेत.

साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार दरवर्षी भारतीय अनुवादकांनी आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, राजस्थानी, संस्कृत, संथाली, सिंधी, तामिळ, उर्दू आणि तेलुगू या भाषांमध्ये अनुवादित केलेल्या उत्कृष्ट साहित्यकृतींना दिला जातो.

हे पुरस्कार एका दिमाखदार समारंभात प्रदान केले जातात. पुरस्काराचे स्वरूप ५० हजार रुपये आणि ताम्रपट असे आहे.

साहित्य अकादमी यांनी भारतीय अनुवादकांना, त्यांच्या हितचिंतकांना आणि प्रकाशकांना २०२५ च्या साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कारासाठी मान्यताप्राप्त सर्व २४ भारतीय भाषांमध्ये अनुवादित पुस्तके सादर करण्याचे आमंत्रण दिले आहे. २०१९, २०२०, २०२१, २०२२ आणि २०२३ मध्ये (म्हणजे १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान) प्रथमच प्रकाशित झालेल्या पुस्तकांचा पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

प्रत्येक पुस्तकाच्या १ प्रतीसह अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे. पुरस्काराची सविस्तर माहिती, www.sahitya-akademi.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे, असे अकादमीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# कथा एका चौकाची....

ज्योतिर्मय साहित्य

शिवछत्रपतींनी उभारलेल्या स्वराज्याचे रुपांतर मराठ्यांनी साम्राज्यात केले...मराठ्यांच्या पराक्रमाचा दबदबा पुर्या हिंदोस्तानात गाजत होता.अशाच वेळी अहमदशाहा अब्दाली दिल्लीवर चालून आला .दिल्ली हादरली होती.मग मात्र दिल्ली रक्षणाची जबाबदारी घेतलेल्या मराठ्यांनी आव्हान स्विकारुन दिल्ली गाठली...नेतृत्व करीत होते सदाशिवराव भाऊ पेशवे....भाऊंच्या हाताखाली होळकर,शिंदे,पटवर्धन,मेहेंदळे असे कसलेले आणि पराक्रमी सरदार होते...

दोन्ही सैन्य समोरासमोर उभी ठाकली होती. एकमेकांच्या सेना एकमेकांची ताकद अजमावत होते.याचवेळी भाऊची सेनाप्रमुखांशी खलबते चालू होती...अशाच एका खलबतात जनकोची शिंदे या अठरा वर्षाच्या सरदाराच्या स्वाभिमानाला धक्का लागला...तसा जनकोजी पेटून उठला छावणीतून बाहेर पडला आणि सैन्यासहित गिलच्यांच्या सैन्यावर कोसळला...बघताबघता १००००सैन्य गारद केले.पण जनकोजी शिंदेच्या पाठराखणीला भाऊंनी पराक्रमी सरदार बळवंतराव मेहेंदळेना सैन्यासह पाठविले..पण अंतर्गत वादामुळे बळवंराव मात्र लढणार्या जनकोजीला लांबून पहात होते...शेवटी भीम पराक्रम करत जनकोजी सदाशीवभाऊंकडे परत आला.भाऊंनी त्याचा सत्कार केला.तसा जनकोजीनी भाऊंना प्रश्न विचारला माझ्या मागे बळवंतरावांना का पाठवला होता. ?आणि बळवंतराव काय करत होते विचारा त्यांना..त्यावरुन शब्दाला शब्द झाला.दरबार संपला....सगळे सरदार आपआपल्या छावणीत पोहचले...पण बळवंतरावांच्या बायकोला घडला दरबारातील प्रसंग कोणीतरी लगबगीने कळवलाच.... आणि त्या आर्यपत्नीचा स्वाभिमान दुखावला...तीने आरतीच्या तबकातील निरांजन पेटविले..आरती घेऊन ती छावणीच्या दरवाजातच उभी राहिली..एव्हढ्यात बळवंतराव जवळ आले...आर्यपत्नी म्हणाली ,''या पराक्रम करुन आलात ओवाळते पंचारतीने'' आपण रक्ताचा थेंबही आपल्या अंगावर न उडविता गिलचे कापलात.....बळवंतरावांनी मान खाली घातली..तसा पत्नीच्या तोंडाचा सुटला...ती म्हणाली उद्या माझ्या पोराने लोकांना कोणाचा पोर म्हणून सांगाव?एका नामर्दाचा? की पळपुट्याचा?लाज कशी वाटली नाही तुम्हाला?

पत्नी ताडताड बोलत होती...आणि बोलता बोलता म्हणाली ,जा परत गिलच्यांना ठेचा त्याशिवाय तोंडही मला दाखवू नका..जिंकून आलात ओवाळीन आणि लढताना स्वर्गवाशी झालात तर सगळ्यात पहिल्यांदा मी तुमच्या शवासोबत स्वर्गात असेन....

गरम शिश्याचा रस कानात ओतावा तसे ते शब्द बळवंतरावांच्या कानात पेटले....सरदशी हात तलवारीवर निघाला..बळवंतरावांनी घोड्यावर मांड ठोकळी...बळवंतरावांचे बाहू स्पुरण पावले...हर हर महादेव ..जय भवानी..जय शिवाजी आरोळी घुमली....अफाट कापाकापी सूरु झाली....गिलचे पाठीला पाय लावून मागे हटत होते..बळवंराव त्वेशाने दांडपट्टे फिरवत होते...त्यांचे कान फक्त आकडे एकत होते...हजार...पाचहजार...आठहजार....एकच कापाकापी...रक्ताचा चिखल अन प्रेतांचा ढीग...दिसू लागला...एव्हढ्यात पाठीमागच्या बाजूने शिंगाचा हलगीचा नाद घुमला...फिरणारा दांडपट्याला स्वल्पविराम देत बळवंतरावांनी मागे पाहिल...साक्षात सदाशिवराव पेशवे लढण्यासाठी आणि बळवंतरावाच्या प्रेमासाठी रणांगणात....बळवंतरावांच्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले...प्रत्यक्ष स्वामी....फक्त माझ्यासाठी... खरच धन्य झालो मी आज...एव्हढ्यात बळवंतरावांवर काळाने झडप घातली...एक दोन तीन चार गोळ्या बळवंतरांवाच्या छातीची चाळण करुन मोकळ्या झाल्या...भीमाच्या ताकदीचा बळवंतरावाचा देह धरणीवर कोसळला....सदाशीवभाऊनी त्या अचेतन देहाला मिठीच मारली...आदर्श प्रेमाच हे उदाहरण....

बाजीराव सुधाकर जांभेकर
मु.पो.पोंभुर्ले ता.देवगड जि.सिंधुदुर्ग
९४०५८२९६६९/९०७५३८५२५६

भाऊंनी तो देह मागे आणला.पानपताजवळ अग्नी देण्यासाठी चिता रचली..बळवंतरावांची पत्नी सती जायला निघाली...त्या सती जाणार्या पत्नीला सदाशीवराव भाऊ सांगत होते...बाई तुला दोन वर्षाचा मुलगा आहे किमान त्याच्यासाठी तरी सती जाऊ नको...पण बाई आपल्या निश्चयावर ठाम राहिली... तिने ते पोर उचलून भाऊंच्या पदरात घातले आणि भाऊंना म्हणाली की याचा सांभाळ आपण करा...आणि मोठा झाला की फक्त एव्हडच सांगा त्याला ''''तुझे आई वडील का मेले''हीच आठवण द्या...बाकी करण्यास तो नक्कीच समर्थ होईल कारण तो वीराचा पुत्र आहे.....पुढे १४ जानेवारी १७६१ ला पानिपतचा रणसंग्राम झाला....मराठे तळहातावर शीर घेऊन लढले...देशासाठी ..धर्मासाठी....महाराष्ट्राची एक तरुण पीढी एका दिवसात पराक्रम करीत मावळली ...

पण,पानिपतात जय मिळवूनही अहमदशहा अब्दालीने हाय खाल्ली मराठ्यांची...अब्दालीने काही दिवसातच हिंदोस्तान सोडला.... पण महाराष्ट्राने मात्र पुन्हा यज्ञकुंड पेटवला आपल्या स्वाभिमानाचा.... राष्ट्रभक्तीचा आणि १७७५-७६च्या वर्षात मराठ्या पुन्हा दिल्लीला धडक दिली...पार सिंधूपर्यत भगवा रोवला....यात एक १६/१७ वर्षाचा पोर भीमथडी पराक्रम करत होता...पानपतावरच्या युद्धाचे उट्टे फेडत होता...आपल्या तलवारीचे पाणी त्याने हजारोंना पाजले....तो पोर म्हणजेच...लढवय्या बळवंतराव मेहेंदळेचाच मुलगा...आप्पा बळवंत मेहेंदळे....आपल्या आई वडीलांच्या हौतात्म्याची आठवण जिवंत करणारा.....

त्याच्या पराक्रमावर बेहोत खूश होऊन पेशव्यांनी त्याची आपल्या शनिवारवाड्याजवळ राहण्याची हवेली उभी करुन दिली....आणि त्याची आठवण म्हणूनच शनिवारवाड्याच्या कडेच्या चौकाचे नाव ठेवले गेले ''आप्पा बळवंत चौक...''

या चौकाच्या नावाच्या निम्मित्ताने स्मरण त्या बळवंतराव आणि आर्यपत्नीचे, स्मरण त्या सैन्यावर पोटच्या पोरासारखे प्रेम करणार्या सदाशिवरांवांचे आणि आई वडीलांचा शब्द साकार करणार्या त्या आप्पा बळवंतांचे....राष्ट्रासाठी स्वतःची आहूती देणार्या या सार्या वीरपुरुषांना दंडवत...

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559